# आरोग्यसेवांच्या विकेंद्रीत नियोजनातील लोकसहभाग

(Community Participation in Decentralize Planning)

## 'आरोग्यसेवांचे विकेंद्रीत नियोजन' कोर्ससाठी
## प्रशिक्षण मार्गदर्शिका क्र. – ३

**साथी प्रकाशन**

**S**upport for **A**dvocacy & **T**raining to **H**ealth **I**nitiatives

(Action Centre of Anusandhan Trust evolved from CEHAT)

- **संकलन-लेखन**

  हेमराज पाटील

- **मार्गदर्शन**

  डॉ. अभय शुक्ला

  डॉ. नितीन जाधव

- **विशेष सहकार्य**

  शैलेश डिखळे

- **प्रकाशक**

  **साथी**

  फ्लॅट नं. ३ व ४, अमन ई टेरेस, प्लॉट नं. १४०,

  डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११ ०२९

  दूरध्वनी क्रमांक - २५४५१४१३, २५४५२३२५

  ई-मेल : cehatpun@vsnl.com

  वेब साईट : www.sathicehat.org

- **अर्थसहाय्य**

  अलायन्स फॉर हेल्थ पॉलिसी ॲन्ड सिस्टीम रिसर्च, जागतिक आरोग्य संघटना (WHO)

Alliance for Health Policy and Systems Research

- **तांत्रिक सहाय्य**

  डॉ. भुपिंदर कौर औलख

# आरोग्यसेवांच्या विकेंद्रीत नियोजनातील लोकसहभाग, दृष्टिकोन, लोकसहभागाचे महत्त्व व आवश्यकता, लोकसहभागीय आढावा (PRA)

साथी प्रकाशन

**S**upport for **A**dvocacy & **T**raining to **H**ealth **I**nitiatives

(Action Centre of Anusandhan Trust evolved from CEHAT)

# या मार्गदर्शिकेविषयी थोडक्यात...

दिल्लीत किंवा मुंबईत आखलेल्या योजना स्थानिक पातळीवर यशस्वी होतीलच असे नाही. किंबहुना गावपातळीचे अनुभव विचारात न घेतल्याने अनेक योजना फसतात. म्हणूनच विकेंद्रीत नियोजन या संकल्पनेला महत्त्व आहे. १९५१ पासून भारताने पंचवार्षिक योजनांमार्फत नियोजनबद्ध विकासाची कास धरली. नियोजन आयोग ही नियोजनातील सर्वोच्च यंत्रणा. या यंत्रणेनं विकेंद्रीत नियोजन प्रक्रियेतून विकास योजनांची आखणी करणं अपेक्षित आहे. पण अनेक वर्षे केंद्रित नियोजनच सुरू होतं. अलीकडे विकेंद्रीत नियोजनाला मूर्त रूप देण्याचा प्रयत्न होत आहे. विशेषतः राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशनमधून आरोग्यसेवांमध्ये जिल्हा नियोजन प्रक्रियेला वेग दिला जातोय. या प्रक्रियेला आपण एक संधी म्हणून पाहायला हवं. लोकाधारित देखरेख प्रक्रियेच्या पाच जिल्ह्यांमध्ये विकेंद्रीत नियोजनासाठी प्रयत्न होत आहे हे उत्तम. पण या प्रक्रियेने आणखी वेग घेऊन अधिक ठोस कल्पनांना नियोजनात सामावून घ्यायला हवं यासाठी लोकांचा नियोजनातील प्रत्यक्ष सहभाग महत्त्वाचा आहे.

कोणत्याही नियोजनात लोकांच्या सूचना समाविष्ट करण्यासाठी विविध पद्धतीचा वापर केला जातो त्यातील एक महत्त्वाची पद्धत म्हणजे 'लोकसहभागामधून ग्रामीण परिस्थितीचा अभ्यास' (PRA). लोकांच्या नेमक्या आरोग्य गरजा, आरोग्य समस्या शोधण्यासाठी स्थानिक परिस्थितीचा अभ्यास असणे गरजेचे आहे. त्याआधारेच आपण नियोजनासाठी सूचना देऊ शकतो. आजपर्यंत होत आलेल्या नियोजनात सूचना या वरूनच दिल्या जात होत्या. त्यामुळे स्थानिक पातळीवरच्या समस्यांवर आधारित नियोजन म्हणजे एक प्रकारचे मृगजळच होते. ही परिस्थिती बदलायची असेल तर नियोजनात लोकसहभागाला सैद्धांतिक पातळीवर यंदा मिळालेले महत्त्व या संधीचा फायदा घेत नियोजनात सक्रिय सहभाग घ्यायला हवा.

## 'लोकसहभागामधून ग्रामीण परिस्थितीचा अभ्यास' (PRA)

या अभ्यास पद्धतीत समस्या किंवा प्रश्न समजून घेण्यासाठी लोकांच्या सक्रिय सहभागातून स्थानिक पातळीवरील विविध स्वरूपातली माहिती गोळा केली जाते. आरोग्य समस्यांची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक तसेच राजकीय कारणे काय आहेत हेही लोकसहभागातूनच जाणून घेतले जाते व या समस्या सोडवण्यासाठीच्या उपाययोजना देखील लोकसहभागातून सुचवल्या जातात किंवा उपाययोजनांची अंमलबजावणी होते. आरोग्यसेवांसोबत शिक्षण, पोषण, शेती, समाजाचा विकास, पशुपालन, घरे व गावाचा विकास अशा सर्व बाबींचा विचार केला जावा म्हणून आपण या मार्गदर्शिकेत **'लोकसहभागामधून ग्रामीण परिस्थितीचा अभ्यास' (PRA)** या विषयावर खोलात माहिती घेणार आहोत. यापूर्वी विकेंद्रीत नियोजन या विषयावर एक संपर्कसत्र व मार्गदर्शिका आपण पाहिली आहे. आता आपण स्थानिक माहितीवर आधारित आरोग्यसेवांचे नियोजन करतांना, लोकसहभागाच्या माध्यमातून गावातील आरोग्य व्यवस्थेच्या त्रुटी आणि उपाययोजना काय-काय असू शकतात, आरोग्य यंत्रणेची व सेवांची परिस्थिती लोकांनी स्वतः जाणून घेऊन गावातील पंचायत प्रतिनिधी, आरोग्य अधिकारी, कर्मचा-यांसोबत आपल्या गावातील गरजा ओळखून देखरेख प्रक्रियेतून उपस्थित झालेले प्रश्न सहभागी पद्धतीने कसे सोडवता येतील; कार्यकर्ता म्हणून आपल्याला आपल्या परिसरात आरोग्यसेवांची स्थिती कशी बळकट

करता येऊ शकते, विकेंद्रीत नियोजनात लोकसहभागाचे महत्त्व आणि भूमिका काय असाव्यात, प्रस्थापित दृष्टिकोन आणि लोककेंद्री दृष्टिकोन म्हणजे काय? अशा ब-याच प्रश्नांची उत्तरे, सूचनांचा शोध आपण मिळून घेण्याचा एक छोटासा प्रयत्न या मार्गदर्शिकेतून करत आहोत.

या मार्गदर्शिकेतून केरळ, तमिळनाडू या राज्यांमध्ये झालेल्या लोकसहभागी नियोजनाचे काही निवडक अनुभवही मांडलेले आहेत. याचा फायदा आरोग्यसेवांवर विकेंद्रीत नियोजन कार्यक्रमाची गुणवत्ता वाढवण्यासाठी आपल्याला निश्चितच होईल अशी आशा आहे.

❑❑❑

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्य विषयक स्थानिक गरजांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने आरोग्यसेवांचे नियोजन विकेंद्रीत पद्धतीने करण्याची उपाययोजना करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने 'आरोग्यसेवांचे विकेंद्रीत नियोजन' हा प्रशिक्षण कोर्स 'साथी' संस्थेमार्फत सुरू केला आहे. आरोग्य क्षेत्रात काम करणा-या विविध कार्यकर्त्यांची, आरोग्य कर्मचारी तसेच स्थानिक पंचायत राज लोकप्रतिनिधींची या विषयाबाबतची क्षमता वाढवणे हा या कोर्सचा प्राथमिक उद्देश आहे. या कोर्सचाच एक भाग म्हणून **'आरोग्यसेवांच्या विकेंद्रीत नियोजनातील लोकसहभाग'** या संदर्भातील माहिती होण्यासाठी ही मार्गदर्शिका बनवलेली आहे. 'साथी'च्या निरनिराळ्या प्रकाशनांपैकी या विषयासंबंधीचा मजकूर योग्य ते बदल करून तसेच इतर काही माहितीचा त्यात समावेश करून केलेले लेखन व संकलन म्हणजे ही पुस्तिका होय.

'साथी' संस्थेचे समन्वयक डॉ. अभय शुक्ला यांच्या मार्गदर्शनातून या मॉड्युलची संकल्पना अस्तित्वात आली. पुस्तिका तयार करतांना त्यांच्याबरोबर झालेल्या चर्चा व त्यांचे मार्गदर्शन अत्यंत उपयोगी पडले. तसेच शैलेश डिखळे यांनी या मार्गदर्शिकेचा मसुदा वाचून त्यावर तपशिलवार संपादकीय संस्कार केले.

'आरोग्यसेवांच्या विकेंद्रीत नियोजनातील लोकसहभाग' ह्या विषयीची मांडणी करतांना लेखन व संकलनात 'साथी' संस्थेतील डॉ. नितीन जाधव यांनी संपादकीय संस्कारणासाठी मोलाचे योगदान दिले. त्याचप्रमाणे भाऊसाहेब आहेर यांनी 'आरोग्य संवाद' या विषयाची लेखन व संकलनाची जबाबदारी पार पाडली.

प्रस्तुत मॉड्युलसाठी माहिती संकलित करताना संबंधित विषयातील काम करणा-या विविध संस्था तसेच प्रशिक्षण पुस्तिकांचा वापर करण्यात आलेला आहे. त्यात प्रामुख्याने पुणे येथील 'मासूम' व PHRN या संस्थेच्या प्रशिक्षण पुस्तिकांचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. त्याचबरोबर 'साथी' संस्थेद्वारे प्रकाशित 'करूया आरोग्य संवाद' या पुस्तिकेचाही मार्गदर्शिका तयार करताना उपयोग झाला.

'साथी'मधील निरनिराळ्या सहकार्यांचे सहकार्य ही पुस्तिका बनवतांना मिळाले. 'साथी' संस्थेतील डॉ. अरुण गद्रे, तृप्ती जोशी, शकुंतला भालेराव, सचिन साठे आणि डॉ. निलांगी सरदेशपांडे यांच्यांशी वेळोवेळी झालेल्या चर्चा या मॉड्युलला अधिक मुद्देसूद बनवण्यास कामी आल्या, आणि शारदा महल्ले यांनी प्रस्तुत मॉड्युलची सुबक रचना कमी वेळेत करून दिली.

वरील सर्वांच्या योगदानाबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार! तसेच जागतिक आरोग्य संघटना (WHO)च्या अर्थसहाय्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

अलायन्स फॉर हेल्थ पॉलिसी ॲन्ड सिस्टीम रिसर्च, जागतिक आरोग्य संघटना (Alliance for Health Policy and System Reasearch, WHO)च्या आर्थिक व तांत्रिक सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. विशेष करून डॉ. भुपिंदर कौर औलख यांनी दिलेल्या तांत्रिक सहकार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार!

हेमराज पाटील
साथी

❑❑❑

# अनुक्रमणिका

**प्रस्तावना** ........................................................................................................८

**प्रकरण १ -** विकेंद्रीत नियोजनाचा दृष्टिकोन.....................................................................९

**प्रकरण २ -** विकेंद्रीत नियोजनामध्ये लोकसहभागाचे महत्त्व व आवश्यकता.................................१२

**प्रकरण ३ -** गावातील लोकांच्या सहभागाने माहिती गोळा करणे किंवा आढावा, संवाद साधणे...........१६

**प्रकरण ४ -** लोकांच्या सहभागातून आरोग्य कर्मचारी आणि अधिकारी यांच्याशी संवाद करण्याच्या प्रक्रियेविषयी.............................................................................२३

**प्रकरण ५ -** विकेंद्रीत नियोजनात लोकसहभागामुळे बदल घडतात...........................................२८

❑❑❑